आमची नवीन प्रकाशनें

नवीन मोठा आरती संग्रह	तीनरंगी मुखपृष्ठ	२५	न. पैसे
नवीन पाळणें संग्रह	तीनरंगी ...	२५	...
पंढरीचा महिमा	सुंदर मुखपृष्ठ	२५	...
नवीन मनोरंजक उखाणे म्हणी	द्वीरंगी ...	२५	...
रंगेल लावण्या	तीनरंगी ...	२५	...
जादूची जत्रा	द्वीरंगी ...	२५	...
जादूगाराचे बेट	द्वीरंगी ...	२५	...
अरबस्तानी परी भाग १ व २	द्वीरंगी ...	२५	...
नागमणी	... ...	२५	...
नवीन मंगलाष्टकें	सुंदर मुखपृष्ठ	२०	...
लग्नाचीं गाणीं	द्वीरंगी ...	२०	...
नटरंगी नार	सुदर ...	३०	...
संगीत भजनी गौळण संग्रह	तीनरंगी ...	५०	...
श्रीसाईनाथ चरित्र आणि भजने	... ...	३७	...
श्रीगाडगे महाराज चरित्र		२५	...
श्री हाजीमलंग चरित्र	तीनरंगी मुखपृष्ठ	२५	...
अंगाई गीतें	... ...	२५	...
प्रीतम गीतें	... ...	२५	...
महाराष्ट्राचीं स्त्री गीतें	... ...	३०	...

— सेंट्रल प्रकाशन —
सिंपलेक्स बिल्डिंग, पाववाला स्ट्रीट, न्यू चार्नीरोड. मुंबई ४

प्रेम आंधळं असतं

to be quoted < lyricism / music



कथासार

पैसा हीच प्रतिष्ठा, अशी सरसाहेबांची कल्पना ! म्हणूनच आपल्या नोकरांच्या-हरितात्यांच्या-मुलानं आपल्या कोचावर बसावं, हें त्यांना सहन होत नाहीं, दोन्हीं गाल रंगवुन ते चारु-ला आपल्या घरीं पाठवतात.

पण आईच्या प्रेमळ हृदयाला हें कसं सहन व्हावं ? गोपिकाबाईच्या मनांत या घटनेनं एक शल्य निर्माण होतं आणि चारुच्याहि हृदयांत तें कायमचं घर करून रहातं.

मात्र सर साहेबांच्या पाषाण हृदयांतही त्यांची आश्रित कन्या वीणा-मायेचा पाझर निर्माण करते ! तरीही त्या निर्झराचा ओलावा सरसाहेब इतरांच्या वांट्याला जाऊ देत नाहींत. त्यांची इच्छा असते, वीणानं आपल्याच तोलामोलाच्या विश्वासशीं लग्न करावं आणि...

परंतु सहज सुलभ प्रेरणेनं वीणा चारूच्या प्रेमांत पडते आणि या चोरट्या साक्षी मत्सरी विश्वास सरसाहेबांच्या समोर मांडतो. प्रेम आंधळं असतं, म्हणून सरसाहेब या बेडाचाराला हंसतात- त्यांच्या लक्षांतहि येत नाहीं, कीं आंधळ्या जगाला, आंधळ्या प्रेमाला हंसण्याचा काय अधिकार, म्हणून वीणा चारु-शीं अधिकाधिक एकरुप होत आहे.

◀ चित्र साधना कृत ▶

दिग्दर्शक—दिनकर द. पाटील ◎ संगीत—राम कदम

कलाकार—आशा पोतदार, रमेश देव, लीला चिटणीस, जीवनकला

गीतें—ग. दि. माडगुळकर

प्रेम आंधळं असतं मधील गाणीं

—१— ✓ — Record

चारु—स्वप्नांतल्या फुलांचा होईल काय हार
आभाळ कोरतो कां ? चित्रांतला मिनार ?
आली असे विरामां येथेंच स्नेहगाथा
आभास रंगविता येणार काय हाता

वीणा—आभास ना सख्या हा माझी विशुद्ध प्रीती
भवितव्य ठेविलें मी सारें तुझ्याच हातीं
कां रे अशी निराशा तू ओतलीस माथा
कां साथ सोडिसी रे सिद्धी समीप येता

चारु—निष्कांचना निराशा ही एक जन्म जोड
माझी कुबेर कन्ये तुज संगती विजोड
पाषाण होय तारा पृथ्वीतलास येतां
आभास रंगवीतां येणार काय हातां

वीणा—माझ्या तुझ्या जगाचा व्यवहाररे निराळा
स्वप्नेच स्वर्ग माझा स्वप्नेच कल्पमाला
स्वप्नां सजीवता दे तू एक प्राणदाता

का साथ सोडीसीरे सिद्धी समीप येता
चारू—आभास रंगविता येणार काय हाता
भूपाळी— २

सं गीताचा प्रारंभ
पहाटेचे रम्य वातावरण

जागरे यादवा कृष्ण गोपालका
फिकटल्या तारका रात सरली
पक्षिगण जागले किलबिलूं लागले
दृश्य
अजुन का लोचनी नीज उरली १
उमलला फुलवरा गंध ये मोहरा
मंद यमुनाजळीं झुळुक शिरली २
उठुन गोपांगना करिति गोदोहना
हर घरीं जणुं सधाधार झरली ३
निवळल्या दशदिशा अंबरीं ये उषा
सोनियाने तिची मूठ भरली ४

—३—

बोलूं दे लोकां हवें तें काय लोकांना कळे
आंधळयांनीं का म्हणावें ? प्रेम असतें आंधळें
प्रेम वेडा मोर नाचे प्रेमरंगी कौतुकें
पंख तितके नेत्र होती स्वर्गही खाली झुके
प्रेमिकांचे विश्व आहे विश्वाहुनी या वेगळें
आंधळयानी का म्हणावें प्रेम असतें आंधळें
जन्म कैलासांत घेते घे उडी जी भूतळी

सागराशी अचुक मिळते ती नदी का आंधळी
परत फिरतो ओघ का तो लोकनिंदेच्या न कळे
आंधळयांनी का म्हणावें प्रेम असतें आंधळें
माझिया प्रेम घतेला सूर्य चंद्राची दिठी
आडवे येवोत कोणी मी तुझीरे शेवटीं
बंधने देहास कोटी प्राण माझे मोकळे
आंधळयांनी का म्हणावें प्रेम असतें आंधळें

४

लग्न ठरविलें तुम्हीं अशी हो खबर चार चौघांत
झुलत ठेवुनी मला कसा हो असा साधला घात
तुमच्या वाचुन जन्म काढणें असह्य ही कल्पना
कशी मी राहूं तुमच्याविना...
तुम्ही प्रीति सागर मी तुमची मासळी
मी जगेन कैसी ? जळांतुनी वेगळी ?
अशी कशी हो केलित वेडीची वंचना १
तुम्हीं प्रीति सूर्य मी सूर्यफुलाची कळी
कशी तुम्हांविना ही उमलावी पाकळी
कळीच जावी करपुन ऐसे कसे भावलें मना २
हीं पत्रें, चित्रें भेटीच्या देणग्या
या ठरल्यां अवघ्या विरहाच्या वानग्या
काळिज गेल्यावरी कशाला छातीवर दागिना ३

—५—

चारू–दूर राहिलें जग स्वार्थाचें वळुन नको पाहूं
सखे चल दूर दूर जाऊं
निळें सांवळें वरती अंबर तळीं असावा अथांग सागर
बेट मधोमध हिरवें सुंदर
त्या बेटावर आपण दोघे लक्ष युगें राहू
सखे चल दूर दूर जाऊं
वीणा—त्या बेटावर नगर नसावें
निम्सर्ग वैभव मुक्त हंसावें दोन जिवांचें राज्य वसावे
राजहंस से नांदू तेथें खगापरी गाऊं
सख्या चल दूर दूर जाऊं
चारू–शांत सुरक्षित स्थल हें रमणी
जळीं तरंगे दुसरी धरणी स्नेहल शांती वातावरणीं
झाडें वेली करिती स्वागत उंचावुन बाहू सुखें इथे राहू

नृत्य खंड आणि नंतर एकाएकीं स्फोट

वीणा–स्फोट कशाचा कसला हा स्वर
प्रतिष्ठासुर—उभा प्रतिष्ठासूर मी भेसूर
चारू–कशास येसी या द्वीपावर
प्रतिष्ठासूर–माझें हें वन माझा सागर
चारू—सौन्दर्याचा स्वामी ईश्वर

वीणा—केवळ प्रीती शकेल याच्या आस्वादा घेऊं
प्रतिष्ठासुर–मी न जाणतों प्रीती भक्ति
शक्ति एकच अजिंक्य जगतीं
अधिराज्य हें माझें येथे पाय नका ठेऊ

६

कुणीतरी सांगां श्रीहरीला एकदां भेट राधिकेला
विसरलास कां देवा गोकुळ बालपणीचें वय तें अवखळ
विसरलास कां यमुनातटीच्या मुग्ध प्रेम लिला
एकदां भेट राधिकेला, मूर्ती तुझी ही रोज पूजितें
कसें कळावें प्रिया तुला तें
आठवितां तुज विसर निजेचा पडला नयनाला
एकदां भेट राधिकेला...

प्रकाशक–एफ. बी, बुरहानपूरवाला, सेंट्रल प्रकाशन;
सिपलेक्स बिल्डिंग, पाववाला स्ट्रीट, न्यू चर्नीरोड, बंबई ४

मुद्रक–सज्जाद हुसेन कुर्बान हुसेन
बाकीर प्रिंटिंग प्रेस, मुझफ्फराबाद हॉल, ग्रँट रोड; बंबई ७